





दैनिक
# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ०६ वा ● गुरुवार २३ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 06 | Date : 23/05/2024 blow Thursday Page 4 Price 4


### शालेय विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी

## राज्यात पहिली ते दहावीसाठी 'हॅपी सॅटर्डे' उपक्रमाचे आयोजन

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

: राज्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण मंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील विद्यार्थ्यांसाठी शासन 'हॅपी सॅटर्डे' हा नवा उपक्रम राबवणार आहे. आचार संहिता संपल्यानंतर या उपक्रमाची घोषणा केली जाणार आहे. पुढील शालेय शिक्षण वर्षापासून या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. 'हॅपी सॅटर्डे' हा उपक्रम पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी असणार आहे. या उपक्रमांतर्गत वही, पुस्तक म्हणजे दप्तर शनिवारच्या दिवशी शाळेत आणायचं नाही.



या दिवशी विद्यार्थ्यांना शेती, क्रीडा, कला, तंत्रज्ञान, विज्ञान या विषयीच्या विविध उपक्रमांचे प्रात्यक्षिक शिकवण्यात येणार आहे, .यासाठी विद्यार्थ्यांना मैदानात घेऊन जाण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना तणाव मुक्त करण्यासाठी शासनाचा उपक्रम असल्याची माहिती देण्यात आली आहे. सध्या विद्यार्थी आणि तरुण मोबाईलमध्ये गुंतले आहेत. यामधून विद्यार्थ्यांना बाहेर काढत मैदानाकडे नेण्याचा यामागचा उद्देश आहे. याआधी राज्यातल्या चौथीपर्यंतच्या शाळांची वेळ बदलण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानुसार सर्व माध्यमांच्या चौथीपर्यंतच्या शाळा आता सकाळी ९ वाजता भरणार आहेत. सर्व माध्यमांच्या तसंच सर्व व्यवस्थापनांच्या शाळांनी पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी ९ किंवा ९ वाजल्यानंतर भरवण्याचे परिपत्रक (ऋठ) राज्य सरकारने काढलं होतं. राज्यपालांनीही शाळेची वेळ बदलण्याची सूचना केली होती मुलांची झोप होत नसल्याने शाळांची वेळ बदलण्याची मागणी होत होती. त्यानंतर राज्य सरकारने चौथीपर्यंतच्या शाळांची वेळ बदलण्याचा निर्णय घेतलाय.

पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शाळा सकाळी नऊच्या नंतर भरवण्याच्या निर्णयाला स्कूलबस मालकांनी (डलहेश्र ईंी जुपशी) विरोध केला. शिक्षण विभागाने चर्चा न करता मार्ग काढल्याने निर्णयाची अंमलबजावणी करताना अडचण होत असल्याचं स्कूल बस मालकांचा म्हणणं आहे. निर्णयावर फेरविचार न केल्यास आणि स्कूल बस मालकांना सक्ती केल्यास स्कूलबस चे भाडे २५ ते ४० टक्क्यांनी वाढवणार असा इशाराही स्कूल बस मालकांनी दिला आहे. शाळा व्यवस्थापन आणि स्कूल बस मालकांशी कुठल्याही प्रकारे चर्चा न करता हा निर्णय शालेय शिक्षण विभागाकडून घेण्यात आल्याचा स्कूल बस मालकांचे म्हणणं आहे

### प्रशांत किशोर यांची भविष्यवाणी

## मोदी ४०० पार करणार नाहीत, पण सरकार स्थापन करतील

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राजकीय रणनीतीकार म्हणून प्रसिद्ध असलेले प्रशांत किशोर हे अनेकदा राजकीय परिस्थितीबाबत विश्लेषण करत असतात. लोकसभा निवडणुकीचे पाच टप्पे झाल्यानंतर त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच तिसऱ्यांदा सत्तेवर येणार असल्याचे सांगितले आहे. तसेच मोदींच्या तिसऱ्या कार्यकाळात इंधनाला जीएसटीच्या कक्षेत आणले जाऊ शकते, असे भाकीत वर्तविले आहे. यामुळे राज्याच्या आर्थिक स्वायत्ततेवर लक्षणीय अंकुश लावला जाऊ शकतो, असेही ते म्हणाले. इंडिया टुडे वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये प्रशांत किशोर यांनी मोदींच्या तिसऱ्या कार्यकाळात चार बाबी प्रामुख्याने बदलणार असल्याचे सांगितले. तसेच भ्रष्टाचाराच्या विरोधात आणखी संरचनात्मक आक्रमक बदल होऊ शकतात, असेही ते म्हणाले.मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाची सुरुवात धडाक्यात होऊ शकते. केंद्र सरकारकडे सत्तेचे अधिक केंद्रीकरण केले जाईल. राज्यांच्या आर्थिक स्वायत्ततेवर घाला घालण्याचे प्रयत्न यातून होऊ शकतात, असे प्रशांत किशोर म्हणाले. प्रशांत किशोर यांनी २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवडणूक प्रचाराची जबाबदारी सांभाळली होती. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीबाबत बोलताना प्रशांत किशोर म्हणाले की, पंतप्रधान मोदींविरोधात जनतेमध्ये रोष दिसत नाही. भाजपा ३०३ च्या आसपास जागा जिंकू शकते.



प्रशांत किशोर म्हणाले की, पेट्रोलियम पदार्थ, मद्य आणि जमीन खरेदी-विक्री यातून राज्याला महसूल मिळत असतो. पुढील काळात पेट्रोलियम पदार्थ जीएसटीच्या कक्षेत आले तर मला आश्चर्य वाटणार नाही.

पेट्रोलियम पदार्थ जीएसटीच्या कक्षेत आणावेत अशी या क्षेत्रातील कंपन्यांची जुनी मागणी आहे. राज्यांनी मात्र या मागणीला विरोध केला आहे, इंधनातूनच राज्याला महसूल प्राप्त होत असतो. जर पेट्रोलियम पदार्थ जीएसटीच्या कक्षेत आणले तर राज्यांना महसूलासाठी केंद्रावर अवलंबून राहावे लागेल. सध्या जीएसटीमध्ये २८ टक्के ही कराची उच्च पातळी आहे. तर पेट्रोल आणि डिझेलसारख्या इंधनावर १०० टक्क्यांहून अधिक कर लावला जातो.राज्यांच्या संसाधन वापरांवर बंधने येऊ शकतात, असे भाकीत प्रशांत किशोर यांनी वर्तविले आहे. तर राजकोषीय जबाबदारी आणि अंदाजपत्रक व्यवस्थापन (ऋछइच्) चे निकष आणखी कडक केले जाऊ शकतात, असेही ते म्हणाले. २००३ साली ऋछइच् कायदा लागू करण्यात आला होता. या कायद्यानुसार राज्यांच्या राजकोषीय तूटीवर मर्यादा आणण्यात आल्या आहेत. मोदींच्या तिसऱ्या कार्यकाळात भू-राजकीय समस्यांना सामोरे जाताना भारत आणखी खंबीर भूमिका घेईल, असाही अंदाज प्रशांत किशोर यांनी व्यक्त केला आहे. जागतिक स्तरावर इतर देशांशी व्यवहार करताना भारताची खंबीरता वाढेल, असेही प्रशांत किशोर म्हणाले.

## पुणे अपघात प्रकरणात कोर्टाचा मोठा निर्णय, अल्पवयीन मुलाचा जामीन रद्द

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे कल्याणीनगर अपघातप्रकरणी बाल हक्क न्यायालय मोठा निर्णय दिला आहे. अपघाताला कारणीभूत ठरलेल्या अल्पवयीन मुलाचा जामीन रद्द करण्यात आला आहे. मुलाची बाल सुधार गृहात रवानगी करण्यात येणार आहे. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर कोर्टानं हा निकाल दिलाय. सरकारी पक्ष आणि बचाव पक्षाने न्यायदंडाधिकारी एम. पी. परदेशी यांच्यासमोर बाजू मांडली. तर अल्पवयीन तरुणाकडून वकील प्रशांत पाटील यांनी बाजू मांडली. निकालावेळी कोर्ट परिसरात पुणे पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दरम्यान, अल्पवयीन मुलाला सज्ञान ठरवण्यासाठी पुणे पोलिसांकडून ७५ हजार रुपयांचे दारूचे बिल आणि दारू पित असलेले बारमधील सीसीटीव्ही फुटेज कोर्टात सादर करण्यात आलं.कोझी आणि ब्लॅक या दोन्ही पबचे एकूण ७५ हजारचे बिल दिल्याची दारूचे बिल भरताना ऑनलाईन पेमेंट करण्यात आल्याचे पुरावे पोलिसांनी कोर्टात दिले. पण बाल न्यायालयात अल्पवयीन मुलाला सज्ञान घोषित करण्यासंदर्भात आणखीन वेळ लागण्याची । **पान २ वर**

## गृह मंत्रालयाच्या कार्यालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी; बॉम्बशोधक पथक घटनास्थळी

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

दिल्लीच्या नॉर्थ ब्लॉकमध्ये असलेल्या गृह मंत्रालयाच्या कार्यालयाला बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीचा ईमेल प्राप्त झाला असल्याचे पोलिसांनी बुधवारी सांगितले. यानंतर तात्काळ बॉम्ब शोधक पथक आणि अग्निशामक बंब घटनास्थळी पाठविण्यात आले. पोलिसांनी पीटीआयला दिलेल्या माहितीनुसार, नॉर्थ ब्लॉक पोलिसांना धमकीचा ईमेल मिळाल्यानंतर डीएफएसने (दिल्ली फायर सर्विस) हालचाल करत बॉम्बशोधक पथक घटनास्थळी पाठविले.


पोलिसांनी सांगितले की, आमचा शोध सुरू आहे. आतापर्यंत आम्हाला काहीही संशयास्पद आढळलेले नाही. गेल्या काही दिवसांपासून दिल्लीमध्ये लागोपाठ बॉम्बच्या धमक्या दिल्या जात आहेत. शाळा, विमानतळ, रुग्णालय आणि तुरुंगाना बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली गेली आहे. दिल्लीच्या व्यतिरिक्त जयपूर, लखनऊ, कानपूर आणि अहमदाबाद येथील शाळांनाही बॉम्बने उडविण्याची धमकी मिळाली आहे. दिल्लीमधील शाळांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्यानंतर जवळपास १५० शाळांमधील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना तात्काळ बाहेर काढले गेले होते. मेल डॉट आरयू या नावाच्या सर्व्हरमधून बॉम्बची धमकी देणारा ईमेल आला होता. दिल्लीमधील शाळांमध्ये स्फोटके लपविल्याची धमकी दिली गेली.

या धमक्यांचा तपास करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, रशियाच्या ईमेलवरून या धमक्या दिल्या गेल्या होत्या. आरोपीने व्हिपीएनचा। **पान २ वर**

## आजपासून मालवंडीच्या शेखागौरीची यात्रेस प्रारंभ

**बार्शी/प्रतिनिधी:**

बार्शी तालुक्यातील, मालवंडी येथील श्री शेखागौरी यात्रेस गुरवारपासून प्रंरभ होत आहे. दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील पारंपरिक व



सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती 'मालवंडी यात्रा कमिटी' च्या वतीने देण्यात आली. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या 'श्री शेखागौरी' यात्रेनिमित्त गुरवार (ता .२३) मे रात्री संदल व ताफे जंगी मुकाबला , लाईट डेकोरेशन, शोभेचे दारूकाम, धुमाकूळ म्युझिकल नाईट बारामती सोबत लावण्या व बतावण्यांचा व्हरायटी शो. शुक्रवार (ता.२४) रात्री सात वाजल्यापासून पारंपरिक सोंगाचा कार्यक्रम, बँड' चा जंगी मुकाबला, शोभेचे दारूकाम, इश्र्वर बापू पिंपरीकर लोकनाटय तमाशा, बारामती, बारा गावच्या बारा अप्सरा व लावण्या चंद्रा यांचा दुरंगी सामना रंगणार आहे. यात्रेची सांगता शनिवार (ता.२५) रोजी होणार असून सकाळी दहा वाजता कलगीतुरा, लोकगीते व धनगर ओव्या, दुपारी दोन वाजल्यापासून जंगी कुस्त्यांचा फड सुरू होणार आहे. रात्री मंगला बनसोडे यांचा लोकनाट्या तमाशा होईल. शोभेचे दारूकाम सुरू असताना जवळ कोणीही जाऊ नये, बँडमध्ये डान्स करू नये, लाईटच्या खांबास हात लावू नये अशा सुचना 'यात्रा कमिटी' च्या वतीने करण्यात आल्या आहेत.

## राजे लखुजीराव जाधवांच्या समाधीसमोर उत्खननात आढळलं पुरातन शिवमंदिर

**सिंदखेडराजा/दैनिक यशसिध्दि न्यूज**

सिंदखेडराजा येथील राजे लखुजीराव जाधव यांच्या ऐतिहासिक समाधीचं जीर्णोद्धाराचं काम सुरु असताना १३ व्या शतकातील यादवकालीन पूर्व शिवमंदिर आढळून आलं आहे. महाराष्ट्र पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी या मंदिराची पाहणी केली. सोळाव्या शतकातले राजे लखुजीराव जाधव यांच्यासह त्यांची तीन मुलं आणि नातू यांच्याही समाधी या ठिकाणी आहेत. त्यांच्या जतन आणि संवर्धनाचं काम करत असताना हे शिवमंदिर आढळून आलं आहे.

उत्खननात सापडलेल्या या पुरातन शिव मंदिरामध्ये महादेवाची मोठी पिंड असून हे मंदिर मोठ मोठ्या दगडांनी बांधलेले आहे. हे मंदिर हेमाडपंथी बांधणीचे आहे. तर मंदिराखाली दगडी फरशी सुद्धा बसवण्यात आल्याचं दिसून येतं आहे. या ठिकाणी अजून उत्खनन केले जाणार असून, उत्खनन पूर्ण झाल्यानंतरच या मंदिराची गुपितं समोर येऊ शकतात असंही अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. उत्खननात मंदिराचे जे अवशेष मिळाले त्यात शंकराच्या मंदिराचा गाभारा आणि सभामंडप असंही आढळून आलं आहे.

लखुजीराव जाधव यांच्या समाधीचा जिर्णोद्धार आम्ही मागच्या वर्षी सुरु केला होता. या ठिकाणी बराच माती आणि दगडांचा ढिगारा होता. तो काढत असताना आम्हाला हे मंदिराचे काही अवशेष आढळले. त्यानंतर मंगळवारी हे मंदिर आढळून आलं. या मंदिराचं दार, दाराच्या आतमध्ये असलेली शिळा या सगळ्यांवर यादवकालीन उल्लेख कोरलेले आहेत. त्यामुळे हे यादवकालीन मंदिर असावं. मोठ्या दगडांनी हे मंदिर बांधण्यात आलं आहे. मंदिराचा गाभारा, मंदिराचा सभामंडप या गोष्टी आढळल्या आहेत. लखुजीराव जाधव यांची समाधी मंदिराच्या मागे आहे. तर मंदिराच्या सभा मंडपाच्या वर काही समाधी आढळल्या आहेत. याचा अर्थ असा होतो की या समाधी इथे बांधण्याच्या आधीच्या काळातलं हे मंदिर आहे. समाधी स्थळाच्या ठिकाणी रामेश्र्वर मंदिर हे आधीपासून आहे. असं असू शकतं हे मंदिर आणि रामेश्र्वर मंदिर एकाच काळातलं असावं. मात्र याची आम्ही माहिती घेत आहोत. आणखी काय काय पुरावे आढळतात त्यावर या मंदिराचा काळ कुठला ते निश्र्चितपणे सांगता येईल पण हे तेराव्या शतकातलं मंदिर असावं असा अंदाज आम्हाला आहे. अशी माहिती पुरातत्व खात्याचे अधिकारी अरुण मलिक यांनी दिली आहे.

## सीईटी परीक्षेचा निकाल जूनच्या पहिल्या आठवड्यात

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, कृषी शिक्षण पदवी या अभ्यासक्रमाच्या सामाईक प्रवेश परीक्षेचा (एमएचटी-सीईटी) निकाल जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे. निकाल जाहीर करण्यासंदर्भातील प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती सीईटी सेलकडून देण्यात आली. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, कृषी शिक्षण पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी पीसीबी ग्रुपची सीईटी परीक्षा २२ ते ३० एप्रिल, तर पीसीएम ग्रुपची परीक्षा २ ते १६ मे या कालावधीत घेण्यात आली. या परीक्षेसाठी ७ लाख २५ हजार ९३८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६ लाख ७५ हजार ४४४ विद्यार्थ्यांनी सीईटी दिली होती. या विद्यार्थ्यांमध्ये ३ लाख ७९ हजार ८६८ विद्यार्थ्यांनी पीसीएम या गटातून, तर पीसीबी या गटातून ३ लाख १४ हजार ७६५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात निकाल जाहीर करण्याचे नियोजन असल्याची माहिती आयुक्त महेंद्र वारभुवन यांनी दिली. या परीक्षेची उत्तर तालिका आणि उमेदवारांनी सोडलेली प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांच्या लॉगिन आयडीवर प्रसिद्ध केली आहे. पीसीबी ग्रुपच्या विद्यार्थ्यांना २४ मेपर्यंत आक्षेप नोंदवता येईल. तर पीसीएम ग्रुपच्या विद्यार्थ्यांना २६ मेपर्यंत आक्षेप नोंदवता येईल.

## संपादकीय

### सध्या केविलवाणा प्रयत्न ..

उध्दव ठाकरे सध्या अस्वस्थ झाले असून प्रचारसभांमधून विकासकामे, देशापुढील समस्या, आव्हाने यावर न बोलता भाजपवर, विशेषत: भाजप नेत्यांवर शिवराळ भाषेत टीका करण्याचाच एककलमी कार्यक्रम त्यांच्याकडून राबविला गेला. मुळातच भाजप आणि भाजप नेत्यांवर आरोप करताना उध्दव हे जनसामान्यांमध्ये स्वत:चेच हसे करून घेत आहेत. सभ्यतेचा बुरखा पांघरण्याचा प्रयत्न करत आहेत, पण त्यांचे हे फसवे प्रयत्न उघडे पडले असून जनतेसमोर त्यांचा खरा चेहरा गेल्या काही वर्षांमध्ये सातत्याने पुढे आलेला आहे. त्यातून आत्मपरीक्षण न करता, चुकांचा शोध घेत त्यातून बोध न घेता त्यांचा खोटे बोल पण रेटून बोल असा जीवनक्रम बनला आहे. आनुवंशिकतेने वारसा मिळतो, नाव-आडनाव मिळते, पण कार्यातून तो वारसा टिकवावा लागतो, जोपासावा लागतो, हे आज ठाकरेंना ठणकावून सांगण्याची वेळ खऱ्या अर्थाने आलेली आहे. ज्या शरद पवारांच्या विरोधात बाळासाहेब ठाकरेंनी सातत्याने प्रचार केला, रणशिंग फुंकले, कधी राजकीय जवळीक केली नाही, त्या पवारांचे गोडवे गाण्याची वेळ आज उध्दव यांच्यावर आलेली आहे. १९९१ साली विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान छगन भुजबळांनी शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' करत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. शिवसेनेत पहिल्यांदा फूट पडली, त्यामागचे खरे सूत्रधार शरद पवारच होते. ज्यांनी शिवसेना फोडली, त्यांच्याच खांद्याला खांदा लावून महाआघाडीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यात उध्दव धन्यता मानत आहे. ज्या भुजबळांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंना तुरुंगात टाकण्याची पूर्ण तयारी केली होती, त्याच भुजबळांना मंत्रिमंडळात घेऊन मुख्यमंत्रिपदावरून राज्याचा कारभार हाकण्यात या उध्दव यांना कोणताही कमीपणा वाटला नाही. ज्या दिवशी काँग्रेससोबत जाण्याची वेळ येईल, त्या दिवशी मी माझे दुकान बंद करेन, अशी भूमिका शिवसेनाप्रमुखांनी अनेकदा जाहीरपणे मांडली होती. आता उध्दव हे माझा बाप चोरला, असा टाहो फोडतात, त्यांनीच काँग्रेसबरोबर अडीच वर्षे राज्यात कारभार चालविला. बाळासाहेब ठाकरेंच्या विरोधात जे भूमिका घेतात, उध्दव हे रक्ताने बाळासाहेबांचे वारस ठरू शकतात, पण विचारांनी अथवा कृतीने नाही, हे महाराष्ट्राने जवळून पाहिले आहे, अनुभवले आहे. भाजप नेत्यांवर टीका करताना उध्दव भाजपचे व आपले हिंदुत्व वेगळे असल्याचा टाहो फोडतात. फक्त आपल्या सोयीनुसार राजकीय कूस बदलताना हिंदुत्वाची व्याख्या लावण्याचा केविलवाणा प्रयत्न सध्या उध्दव यांनी चालविला आहे.

# बुद्धाला शरण जाताना

तथागत गौतम बुद्ध हे ज्ञानाचे व विज्ञानाचे प्रतिक आहेत. तथागत गौतम बुद्धांचा धम्म हा कोणत्याही कर्मकांडाला, अंधविश्र्वासाला, थोतांड आणि भोंदूगिरी ला कुठेही थारा देत नाही. तथागत गौतम बुद्धांसमोर सर्व मानव, सर्व प्राणी सारख्याच आदर सन्मानाचे आहेत. ते मानसामध्ये कोणताही भेद करण्यासाठी तयार नाही. ज्या प्रमाणे समुद्राचे पाणी असते. त्या पाण्यामध्ये कोणते पाणी कोणत्या नदीचे, कोणत्या नाल्याचे आहे हे सांगणे अशक्य असते कारण समुद्रात गेल्यावर सर्व पाणी हे पाणीच असते. त्याच प्रमाणे बुद्धांचे व धम्माचे नाव घेताना कोणत्याही प्रकारचा भेद करता



येणार नाही. कारण बुद्धांने प्रत्येक माणसाला माणूस म्हणून दर्जा दिला आहे. मी बुद्धांना शरण जातो असे नेहमी बोलणारे आम्ही आम्हाला खरंच बुद्ध आणि त्यांचा धम्म खरचं कळाला का हा खुप गंभीर विषय आहे. काही उदाहरणे बघितले तर आपल्या लक्षात येईल कि बुद्धाला डोक्यावर घेणाऱ्यांनी, बुद्धालाच जातीच मर्यादित करणाऱ्यांनी, बुद्धाला नेहमी शरण जाणाऱ्यांनी बुद्धाला डोक्यात घेतले नाही ही शोकांतिका आहे. आजही स्वतः ला बुद्ध समजणारे, घरात बुद्धांचे फोटो मुर्ती लावणारे जर अज्ञान, अंधविश्र्वास आणि पाखंडवाद पाळत असतील तर ते बुद्धांचे अनुयायी कसे होणार? केवळ देवाला विरोध करून बुद्धांचे अनुयायी होता येत नाही. बुद्धांचे अनुयायी होण्यासाठी बुद्धांचे विचार व कार्य स्विकारावे लागतात. परंतु शोकांतिका आहे की जग विज्ञानाच्या जोरावर प्रगती करत असताना, बुद्धांने जागतिक समता बहाल केली असताना भारतात मात्र बुद्धांलाच जातीत बंद केले जाते, आणि जे बुद्धांवर मालकी हक्क गाजवतात तेच लोक बुद्धांच्या विचाराचे अर्थात धम्माचे पालन करत नाही तेव्हा त्यांच्या बुद्धीची किव येते आणि तथागत बुद्धांच्या विचाराचा व धम्माचा अवमान होतो हे बघुन मन खीन्न होते. बुद्धाला शरण जातो असे म्हणणे खुपच सोपे आहे परंतु जर बुद्धाला खरचं शरण जात असू तर बुद्ध तत्वज्ञान आजही का जोपासले जात नाही हा खुप मोठा प्रश्र्न आहे. बुद्धांचे अनुयायी म्हणवून घेणाऱ्या लोकांनी बुद्धांलाच जातीत व धर्मात बंद करून टाकले. बुद्धांचे विचार व कार्य हा जाती भेद, व्यक्ती भेद व द्वेष उलथून टाकण्यासाठी होता याचाच विसर पडलेला दिसत आहे. बौद्ध धम्माचे उपासक म्हणून घेताना आणि आम्ही धम्माचे पालन करतो असे बोलणारे लोकच धम्माचे पालन करत नाही. जन्मापासून तर मृत्युपर्यंत अनेक विधी केल्या जातात. मुळात क्रियाक्रम, कर्मकांड बुद्धांना मान्य नसताना धम्मातच विधी आल्या कशा? हा खुप गंभीर पण चर्चेचा विषय आहे. यावर कधीच कोणीही बोलत नाही. जन्मापासून मरेपर्यंत अनेक अंधविश्र्वास पाळले जातात जसे बाळाला काळे धागे,काळे टिक्के लावणे, विवाहित महिलांच्या गळ्यात मंगळसूत्र, पायात जोडवे, कपाळावर कुंकू किंवा आधुनिक टीकली, हातात बांगड्या हे सर्व काही महिलांवर आजही लादले जाते. वरिल गोष्टी महिलांवर लादणारे, आणि गुपचूप एकणाऱ्या महिला ही बुद्धांच्या अनुयायी कशा होऊ शकतील? आजही लग्न जुळवताना पोटजातीचा विचार केला जातो, स्वतः ला सुशिक्षित समजणारे व पैशाने मोठे समजणारे लोक लग्न जुळवताना समोरच्या व्यक्तीची जात, आर्थिक क्षमता बघून लग्न ठरवले जातात, मुलगी सौंदर्य तर मुलगा आर्थिक संपतीच्या जोरावर वेगवेगळ्या प्रकारच्या हुंड्याची अपेक्षा करतात आणि लग्नामध्ये मुलगा आणि मुलीला बाशिंग, कट्यार टिकल्या आणि बराच काही साज करून वेगवेगळ्या अंधविश्र्वास आणि भोंदुगिरीला खतपाणी घातले जाते ते लोक बुद्धांचे अनुयायी कसे होऊ शकतात? नवीन घर बांधल्या नंतर वास्तुशांती बुद्धांचे फोटो किंवा मुर्ती समोर ठेऊन विशिष्ट विधीद्वारे केली जाते, मग इतरांच्या सत्यनारायण आणि बौद्धांच्या गृहशांती मध्ये फरक काय? गृहशांतीच्या नावाखाली विधी करणाऱ्यांना सत्यनारायणला विरोध करणे, किंवा सत्यनारायण अंधविश्र्वास आहे असे बोलणे कितपत योग्य आहे? माणसाचा मृत्यू झाल्यावर त्याच्या तोंडात सोने देणे, त्याच्या आवडीचे पदार्थ अस्थिविसर्जनाच्या वेळी तेथे ठेवणे, पितरपाठ घालणे हे ही वैज्ञानिक आहे का? अशा लोकांना बुद्धांचे नाव तरी घेण्याचा अधिकार आहे का? मृतव्यक्तीच्या शोकसभेत बोलताना बुद्धवासी, बुद्ध चरणी जागा मिळो, बुद्ध दु:खातुन सावरण्याची शक्ती देवो अशा प्रकारचे बोलले जाते तर हे बुद्धांना आणि त्यांच्या धम्माला मान्य आहे का? बुद्धांचे चरण नेमके आहेत तरी कुठे? बुद्धवासी म्हणजे नेमकं काय? बुद्ध स्वतः सांगतात मी मुक्तीदाता नाही तर मार्गदाता आहे तरीही बुद्ध दु:खातुन सावरण्याची शक्ती कशी देणार? मुल होत नाही नवस करणे, घरात सुख शांती यायला पाहिजे म्हणून कोणाकडून तरी राख घेणे, एखाद्या भोंदुच्या पाया पडणे असे करणे म्हणजे बुद्धांचा स्वतः च्याच हाताने अवमान करणे होय. बुद्ध विरोधी, धम्म विरोधी कृत्य खुलेआम सुरु असताना ही अनेक स्वतः ला सुशिक्षित व श्रीमंत समजणारे लोक दररोज विहारात जाऊन मी बुद्ध, धम्म व संघाला शरण जातो असे म्हणतील. बुद्धाला फुलासह फळेही अर्पण करतील, एखादा जागृत भिक्खु तेथे असेल तर जिवनात शांती येण्यासाठी हातात पांढरा धागाही बांधुन देतील. अनेक लोक असे आहेत की भगवा आणि काळा धागा अंधविश्र्वासाचे मानतात परंतु पांढरा धागा मोठ्या ऐटीत हातात बांधून स्वतः ला बुद्धांचे अनुयायी समजतात. काळा भगवा धागा लोकांचे भले करू शकत नाही तर पांढरा धागा काय भले करणार आहे? स्वतः ला बौद्ध समजणाऱ्या लोकांनाच बुद्ध व धम्म कळाला नाही ही किती मोठी शोकांतिका आहे. अनेक क्रियाक्रम, कर्मकांड आणि चुकिच्या गोष्टी बुद्धाला शरण जातो म्हणणारे लोक करत असतील तर विज्ञानवादी विचार आणि कर्मसिद्धांतांची अपेक्षा कोणाकडून करायची हा प्रश्र्न उपस्थित राहतो. आर्थिक संपन्न झालेले किंवा दोन चार पुस्तके वाचुन स्वतःला विद्वान समजणारे लोक एकमेकांना फसवण्यासाठी खोटे बोलत असतील, श्रीमंत आणि नोकरदार, सुशिक्षित समजून दारूच्या दुकानात हजारों रुपयांची उधळन करत असतील, लोकांना लुबाडून दिशाभूल करून आर्थिक संपन्न झाले असतील, गाडी बंगला घेतला असेल तरीही त्यांना बुद्धांचे उपासक कसे म्हणता येईल? अनेक लोक तर दारु पिऊन त्रिसरण आणि पंचशील बोलतात. धम्म फक्त बोलण्यासाठी, भाषण देण्यासाठी नाही तर स्वतः स्विकारून जगण्यासाठी आहे. पोथी वाचण्याच्या कार्यक्रमासारखाच ग्रंथ वाचन कार्यक्रम सुरू करून शेवटच्या दिवशी भंडारा देखील केला जातो. म्हणजे हिंदु धर्मातील पूजापाठ व कर्मकांडाला अंधविश्र्वास म्हणायचे आणि स्वतः मात्र तेच कृत्य नाव बदलून करायचे हा धम्म मुळीच नाही. बुद्धाला शरण जाताना अगोदर आपण वैज्ञानिक बनले पाहिजे, वैज्ञानिक बनले म्हणजे आपण माणूस होऊ, माणूस झालो म्हणजे कोणतेही कर्मकांड, अंधविश्र्वास, थोतांडाला थारा न देता ज्ञानाला व कर्माला प्राधान्य देण्यात येईल. आणि बुद्धांचा धम्म हा कोणत्याही जातीच्या धर्माच्या उद्धारासाठी नाही तर समस्त मानवाच्या कल्याणाचा आहे. म्हणून बुद्धांला शरण जातांना अज्ञान, अंधविश्र्वास, पाखंड, भोंदुगिरीला बाजूला सारून वैज्ञानिक माणूस बनावे तरच माणवाचे कल्याण होईल. बुद्ध जयतींच्या समस्त मानवजातीला मंगलमय सदिच्छा...

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# अवकाळीने वडाचीवाडी (अं. ऊ) मधील फळबागा उध्वस्त

## ॲड. मिनलताई साठे शेतकऱ्यांच्या बांधावर



माढा/प्रतिनिधी : सोमवारी रात्री ९ वाजता अचानक पाऊस येऊन वडाचीवाडी (अं. ऊ) मधील लिंबू व डाळिंब बागा उनमळून पडले असून मन सुन्न करणारी घटना सोमवारी रात्री वडाचीवाडी मध्ये घडली त्या घटनेने शेतकरी रस्त्यावर आला आहे. सोमवारी रात्री अचानक वादळात सुरुवात होऊन अवकाळी पाऊस पडला त्यामध्ये वडाचीवाडी अं.ऊ मधील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. लिंबू व डाळिंबाच्या बागा उध्वस्त झाल्या आहेत त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे घरांची पडझड होऊन शेतकऱ्यांना बेघर होण्याची वेळ आली . माढा तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्यामुळे पाणी विकत घेऊन शेतकऱ्यांनी आपल्या फळबागा जोपासल्या होत्या पाण्यासाठी जवळचे पैसे खर्च करून वाढवलेल्या बागा अचानक एका क्षणात उन्मळून पडल्यामुळे शेतकऱ्यांचे कधीही भरून न निघण्याइतके नुकसान झाले आहे त्यामुळे शेतकरी आता प्रशासनाच्या मदतीकडे डोळे लावून बसला आहे .संबंधित घटनेची माहिती युवक काँग्रेस चे जिल्हा उपाध्यक्ष शाहूराजे जगताप यांनी माढा नगरपंचायत च्या नगराध्यक्षा ॲड.मिनलताई साठे यांना फोनवरून देताच मंगळवारी सकाळी माढा नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष ॲड. मिनलताई साठे यांनी वडाचीवाडी अं.ऊ गावास भेट देऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली त्यावेळी त्यांनी फोनवरून तहसीलदारांना झालेल्या नुकसानीची माहिती देऊन शेतकऱ्यांना तात्काळ मदतीची विनंती केली व या दुखद प्रसंगी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहण्याची ग्वाही देत शेतकऱ्यांना दिलासा दिला. प्रशासनाकडे पाठपुरावा करून झालेल्या नुकसानीची भरपाई मिळवण्यासाठी प्रयत्न करून शेतकऱ्यांना मानसिक दिलासा देण्याचे काम ॲड.मिनलताई साठे यांनी केले त्यासोबतच त्यांनी य तहसीलदार यांना शेतकऱ्यांसोबत लेखी निवेदन देऊन तात्काळ पंचनामा करून शेतकऱ्यांना मदत देण्याची विनंती केली फळबागेसोबतच शेतकऱ्यांची घरे व शेतातील गोठेही वाऱ्याने उडून गेले असून त्याचे पंचनामे करून त्यांना मदत करण्याची विनंती ॲड.मिनलताई साठे यांनी केली.त्यावेळी युवक काँग्रेस चे जिल्हा उपाध्यक्ष शाहूराजे जगताप,कृषी सहाय्यक गणेश माळी यांच्यासह वडाचीवाडी अं. ऊ मधील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सांगलीत ३१ अनिधिकृत होर्डिंग, मालकांकडून दंडही वसूल करणार

सांगली : मुंबईतील होर्डिंग दुर्घटनेनंतर सांगलीत करण्यात आलेल्या सर्व्हेमध्ये ३१ अनाधिकृत होर्डिंग असल्याचे आढळले असून ती हटविण्याची मोहिम बुधवारी हाती घेण्यात आली. यापुढे कोणतीही बेकायदा कृती सहन केली जाणार नाही असा इशारा आयुक्त तथा प्रशासक शुभम गुप्ता यांनी दिला. मुंबईतील होर्डिंग दुर्घटनेनंतर महापालिका आयुक्त श्री. गुप्ता यांनी महापालिका क्षेत्रातील अनधिकृत होर्डिंगचा सर्व्हे करण्याचे आदेश प्रशासनाला दिले होते.

यानुसार उपआयुक्त वैभव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा क्षेत्रातील अनधिकृत होल्डिंगचा सर्व्हे करण्यात आला. यामध्ये मनपक्षेत्रात एकूण ३१ होर्डिंग अनधिकृत असल्याचे समोर आले. त्यानंतर आयुक्तांच्या आदेशाने आजपासून अनधिकृत होल्डिग हटवण्यास सुरुवात झाली आहे. यामध्ये आज प्रभाग समिती १ अंतर्गत येणार्या कोल्हापूर रोडवरील २० बाय ४० फूट मापाचा मोठ्या होर्डिंगचा सांगाडा सहायक आयुक्त सहदेव कावडे आणि अतिक्रमण पथक प्रमुख दिलीप घोरपडे यांच्या पथकाने क्रेंनच्या साहाय्याने निष्कासित करण्यात आला. यापुढेही अनधिकृत होर्डिंग हटविण्याची कारवाई सुरूच राहणार असून संबधित होर्डिंग मालकांकडून दंडही वसूल करण्यात येणार आहे असा इशारा उपआयुक्त श्री. साबळे यानी दिला.

पान १ वरुन

### पुणे अपघात प्रकरणात कोर्टाचा मोठा.

शक्यता आहे. पोलिसांनी सज्ञान घोषित करावं अशी मागणी कर्ज करणारा अर्ज दाखल केला होता. कोर्टात आज फक्त अल्पवयीन मुलाला बाल सुधार गृहात ठेवावे या पोलिसांच्या मागणीवरच युक्तिवाद करण्यात आला. याच मागणीवर निर्णय घेण्यात आला.

पुणे कल्याणीनगर अपघात प्रकरणी आरोपीचे वडिल विशाल अग्रवालला २४मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आलीये. त्याच्यासोबत पबचे कर्मचारी नितेश शेवानी आणि जयेश बोनकरलाही २४मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आलीये. सरकारी वकीलांनी सात दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली होता. त्याचबरोबर गुन्हा दाखल झाल्यानंतर विशाल अग्रवाल फरार का झाले? असा सवालही सरकारी वकीलांनी विचारला. शिवाजी नगर कोर्टात तिघांनाही हजर करण्यात आलं होतं.

पुण्यातील कल्याणी नगर परिसरात पोर्शे कार चालवत असलेल्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने एका दुचाकीला धडक दिली होती. या भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. मुलगा अल्पवयीन असून त्याच्याकडे वाहन चालवण्याचं लायसन्स नाही, हे माहिती असतानाही मुलाला कार चालवायला दिल्याचा ठपका विशाल अग्रवाल यांच्यावर ठेवण्यात आलाय.एक बड्या बापाचा लाडाचा पोरगा.. ७५ हजार रुपयांची दारु ढोसून बेदरकारपणे कार चालवत दोघांचा बळी घेतो.. याची चिड पुणेकरांमध्येच नाही तर देशवासियांमध्येही आहे.. त्याने ज्या दोघांना आपल्या कारखाली चिरडलं, त्यांच्या पालकांना न्याय मिळणार का याकडेच सर्वांचं लक्ष आहे.

### गृह मंत्रालयाच्या कार्यालयाल..

वापर केल्यामुळे त्याच्या आयपी ड्रेसचा शोध घेणे कठीण जात आहे. ज्या व्यक्तीने ईमेल तयार केला, त्याला शोधण्यासाठी आम्ही इंटरपोलची मदत घेत आहोत.६ मे रोजी गृह मंत्रालयाने अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी एसओपी जाहीर केली जाईल, असे सांगितले. गृह सचिवांनी दिल्ली पोलिसांना निर्देश देऊन अफवांमुळे तणावाची परिस्थिती उद्भवू नये, यासाठी खबरदारी घेण्यास सांगितले. तसेच सुरक्षा व्यवस्थेचा बंदोबस्त करून शाळांमधील सीसीटीव्ही चित्रणाचे परिक्षण करण्यास सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# मानवाच्या विवेकबुद्धीला केवळ बुद्धाने आव्हान दिले आहे : डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**मित्र हो,** २३ मे २०२४, वैशाख पौर्णिमेला २५८७ वी बुद्ध जयंती साजरी करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने आपण सर्वांना कोटी कोटी सदिच्छा। त्या अनुषंगाने आपल्या माहितीसाठी बुद्धाचे काही विचार बाबासाहेब आंबेडकरांच्या शब्दांच्या सहकार्याने शब्दबद्ध करीत आहे. तथागत बुद्धाचा जन्म, बुद्धत्व प्राप्ती आणि महापरिनिर्वाण या तिन्ही घटना वैशाख पौर्णिमेलाच झालेल्या असल्याने विशेषतः हा वैशाख पौर्णिमेचा दिवस साजरा केला जातो. ६ मे १९५५ ला वैशाख पौर्णिमेला बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवाच्या विवेकबुद्धीला केवळ बुद्धाने आव्हान दिले आहे, असे स्पष्ट केले होते.

बुद्धाने सांगितलेल्या धर्माशिवाय इतर सर्व धर्माची उभारणी ही ईश्र्वर अर्थात देव आणि आत्मा यावर आधारलेली आहे. सजीवांच्या मृत्यू नंतर आत्मा ईश्र्वरात विलीन होतो. असा काल्पनिक आधार 'देव आणि आत्मा' यांची वैचारीक बैठक मजबूत करण्यासाठी दिलेला आहे. अशा कच्च्या पायावर उभारलेला हा, देव-आत्म्याचा पोकळ डोलारा आहे. पुजा-अर्चा, धूप-दीप, तंत्र-मंत्र, जप-तप, कर्मकांड या मार्गाचा अवलंब प्रामुख्याने ईश्र्वर भक्तीसाठी केला जातो. सोबत जीव हिंसा आणि नरबळीचे प्रकार पण केले जातात. या सर्वांच्या मुळाशी जन्माला येतानाच जीव हा सोबत मागच्या जन्माचे पाप घेऊन येत असतो. त्या पापक्षालनातून मुक्ती मिळविण्यासाठी देह झिजवून तप, त्याग साधले तर ईश्र्वराची गाठ पडू शकते. परिणामी जीवन मरणाच्या फे-यातून सुटका होऊ शकते. मात्र बुद्ध धम्मात आत्म्याला अजिबात स्थान नाही, तर ईश्र्वराचे अस्तित्व नाकारण्यात आले आहे. बुद्धाशिवाय इतर धर्मात त्या धर्माचे अनुयायी, तो धर्मच ईश्र्वराने सांगितल्याचे प्रतिपादन करीत असतात. ज्यांच्या मार्फत ईश्र्वराने धर्म सांगितला, त्यांना धर्म प्रवर्तक अथवा दूत मानले जातात. जसे ख्रिश्र्चन धर्मात येशू, यहुदी धर्मात मोझेस, इस्लाम धर्मात मोहम्मद यांना प्रवर्तक मानले जाते. प्रवर्तकाची भूमिका ही ईश्र्वर व मानव संबंधात केवळ पोस्टमन सारखी आहे. ईश्र्वराच्या आदेशाला प्रमाण मानल्यामुळे ईश्र्वर प्रणीत वचनांची चिकित्सा, मिमांसा करण्याचा मार्गच बंद करण्यात आला आहे. उलटपक्षी बुद्ध धम्मात आपल्या बुद्धीला पटेल तरच स्विकार करावे, असे म्हणून विवेकबुद्धीला आवाहन दिलेले आहे. अशा प्रकारे बौद्ध धर्म हा चिकित्सेनंतर सांगितलेला धर्म असून रोगनिदानानंतर दिलेले औषध आहे. तथागतांनी प्रथम मानवी समस्यांचे निदान केले आहे. जगात दु:ख व दारिद्र्य हे महाभयंकर रोग आहेत. हे त्या चिकित्सेनंतर सांगितलेले निष्कर्ष आहे. यालाच बौद्ध धर्माचे अधिष्ठान असे म्हणता येईल. तर मग जगातील दु:ख आणि दारिद्र्य कोणती धारणा नष्ट करू शकेल, याचा सांगोपांग विचार करून ती धारणा अर्थात धर्म अंगिकारला पाहिजे. तरच आपला विकास होऊ शकेल, असे मला वाटते.

मृत्यूनंतर काय होईल? स्वर्ग की नरक या भ्रामक कल्पना जनतेच्या मनात बसवून ऐदी, ऐतखाऊ, धूर्त लोकांनी जनतेला व्यावसायिक दृष्टीने वेठीस धरण्याचा प्रयत्न केला आहे, ज्यात ते यशस्वी झाले आहेत. कष्टमय जीवन सुखमय करण्यासाठी केवळ बुद्धानेच वास्तववादी प्रयत्न करून अध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक अशी महत्त्वाची तीन कारणे शोधून काढली.उपरोक्त तिन्ही कारणांपैकी अध्यात्मिक म्हणजे वैयक्तिक दु:ख होय. जे आपल्याच कर्मानुसार निर्माण होत असते. जसे मद्यसेवन करणारा व्यक्ती हा आपल्या शरीराची व संसाराची राखरांगोळी करीत असतो. यातील द्वितीय कारण अर्थात आधिभौतिक म्हणजे सामुदायिक दु:ख होय. जे विषमतामय वागणुकीमुळे भोगावे लागतात. ज्यामुळे उच्च-नीचतेचा भाव निर्माण होतो. जसे स्पृश्य-अस्पृश्य, गरीब-श्रीमंत, अवर्ण-सवर्ण इत्यादी. परिणामी ब्राह्मणवादाचे अस्तित्व कायम राहते. म्हणून बाबासाहेब म्हणाले होते की, विषमता हे ब्राह्मणवादाचे अविभाज्य भाग आहे. त्याचे समाज जीवनातून समूळ उच्चाटन केले पाहिजे. (Inequality is an essence of Brahmanism. Uproot Brahmanism the Spirit of Inequality in all walks of life.) तसेच तृतीय कारण म्हणजे आदिदैविक अर्थात नैसर्गिक आपत्ती-अपघाताने निर्माण होतात. याची जाणीव ठेवून प्रसंगानुरूप कारण निर्मुलन करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे.



उपरोक्त दु:खाचे सर्व कारणाचे निराकरण करीत असताना वैयक्तिक दु:ख नष्ट करण्यासाठी पंचशीलाचे पालन करणे आवश्यक आहे. ज्यात जीव हत्या, चोरी करने, खोटे बोलणे, व्यभिचार करणे व मादक पदार्थाचे सेवन करण्यास बंदी घालण्यात आली आहे. तर आधिभौतिक दु:ख नष्ट करण्यासाठी अष्टांगिक मार्गाचा अवलंब करने बंधनकारक केले असून त्यात सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्म, सम्यक आजिवीका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी याचा समावेश केला आहे. यामध्ये सम्यक दृष्टी : VISION OF UNDERST-NDING ला प्राधान्य दिले पाहिजे. ज्यामुळे आपले हित साधत असताना इतर कुणाचे अहित, हानी, नुकसान होत नाही, याची जाणीव ठेवली पाहिजे.

**जीवन सुखकर होण्यासाठी सोबत दहा पारमिता सुद्धा सांगितलेल्या आहेत. ज्यात प्रज्ञा :** WISDOM² ही सर्वोत्तम पारमिता आहे. प्रज्ञेचा सुयोग्य वापर न केल्यामुळे अनेक व्यक्ती शेख चिल्ली सारख्या मूर्खाप्रमाणे वर्तन करीत असतात. शील व नैष्कर्म्य याचा परस्पर संबंध आहे. संकटग्रस्ताना वाचविण्यासाठी प्रयत्न करने याला 'दान' पारमिता असे म्हणतात. जनकल्याणासाठी कार्य तत्परतेने व उत्साहाने करने याला 'वीर्य' पारमिता असे म्हणतात. विविध प्रसंगी राग जरी येत असला तरी 'क्षमा' हा गुण प्रयत्नांती जोपासला पाहिजे. सर्व बाबतीत अधिष्ठान अर्थात दृढनिश्र्चय पाळला पाहिजे. सर्वावर प्रेम करणारी 'मैत्री' तर चांगल्या कार्यात अडथळा निर्माण न करणारी 'उपेक्षा' ही पारमिता पाळलीच पाहिजे जेणेकरून नियोजित कार्य निर्विघ्नपणे पार पडतील.

पंचशील, आर्य आष्टांगिक मार्ग आणि दहा पारमिताचे अनुपालन केल्यास दु:खाचा सर्वनाश होणे सहजशक्य आहे. जगातील दु:ख निवारण करणे हे बुद्ध धम्माचे सार आहे. सत्यशोधन आणि सत्यग्रहणाचे कार्य मागे पडल्याने पंडिताऐवजी पुस्तकी ज्ञान धारण करणा-यांचा नवीन वर्ग निर्माण झाला. ग्रंथ वाचून सत्याचे रसग्रहण करण्याची शक्ती निर्माण झाली पाहिजे. नवनवीन संकल्पना आणि सिद्धांत मांडून अंमलबजावणी केली पाहिजे. नुसते भाराभर ग्रंथ वाचून फारसे इप्सित साध्य होत नाही. तर गाढवाच्या पाठीवर ग्रंथ लादण्यामुळे गाढवाला जेवढा लाभ होतो तेवढाच लाभ अशा भराभर वाचण्याने होऊ शकेल.

बुद्ध धम्मात एकूण पुनर्निर्मितीच्या कार्यालाच पुनर्जन्म असे म्हटले असून त्यात आत्म्याला अजिबात थारा नाही. 'कर्म' याचा अर्थ बौद्ध आणि ब्राह्मणात वेगवेगळ्या स्वरूपाचा आहे. जगाचा व्यवहार कसा काय चालला आहे? ब्राह्मणी धर्माप्रमाणे नियंता किंवा ब्रम्हा चालवितो असे म्हणतात. इतर धर्म सुद्धा ईश्र्वर, अल्ला, गॉड या नावाने त्या संकल्पनेला पुष्टी देतात. मात्र बौद्ध धर्मानुसार जगातील व्यवहार दर एकाच्या कर्माने चालत असतात. त्यामुळे बौद्ध धर्माने मनुष्य मात्रावर जबाबदारी टाकली आहे. करावे तसे भरावे, अशी सक्त ताकीद दिली आहे. ज्याला कर्मविपाक सिद्धांत असे म्हणतात. आपल्या क्रियेपासून निर्माण होणारी फळे म्हणजे कर्मविपाक होय. क्रियेचा परिणाम विशिष्ट कालांतराने होतो, जन्मांतराने नव्हे! माझ्या कपाळी हे लिहिले आहे, जे विधिलिखित आहे, ब्रम्हाची रेघ आहे. असे म्हणून हताश न होता. सद्गुणांची बेरीज व दुर्गुणांची वजाबाकी करून स्वतःसह समाजाच्या उत्कर्षाची व विकासाची जबाबदारी पार पाडली पाहिजे.

पतित दोन प्रकारचे असतात. एक जे पतित त्यांना ते पतित असल्याची जाणीव असते, ज्यातून ते मार्ग काढून वर येण्याचा प्रयत्न करीत असतात. तर दुसऱ्या प्रकारच्या पतितांना याची जाणीव नसल्याने ते सुधारू शकत नाही कारण त्यांची मानसिकताच तशी विकसित झालेली असते. करिता आपल्या अध:पतनाबद्दल खंत वाटणा-यांना मार्ग दाखविण्याचे कार्य करण्यासाठी समाजसेवकांची आवश्यकता आहे. समाजाला वैचारिक भूमिका देण्यासाठी व सामाजिक कार्य गतिमान करण्यासाठी सेवकांची आवश्यकता आहे. ज्याचा मेहनताना गरीब समाजाला त्यांना देता येणार नाही. मात्र त्यांच्या पोटापाण्याची सोय जरूर करता येईल. अशा कार्यकर्त्यांना ऐतखाऊ म्हणता येणार नाही कारण हजारो आकर्षणे सोडून समाजसेवा करावी लागत असते. बौद्ध भिक्खूची संघटना ही अशाच सेवेसाठी भगवंतांनी निर्माण केली आहे. हे सतीचे वाण आहे. ते स्विकारून तथागतांनी दाखवून दिलेल्या मार्गाने जाण्याने आज जगाचे कल्याण होईल, मानवतेचे हित होईल. म्हणून मानवाने आपल्या विवेकबुद्धीला आवाहन दिले पाहिजे. जे पटेल ते स्विकार करून मार्गक्रमण केले पाहिजे. असे विवेचन करून आपण सर्वांना बुद्ध जयंतीच्या कोटी कोटी मंगल कामना व्यक्त करतो.

**लेखक : बी. बी. मेश्राम,**

**संचालक फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, नॅशनल कौन्सिल मेंबर आफ दि आल इंडिया नाग असोसिएशन** (-IN- : **आईना). संपर्क : ९४२१६७८६२८**

# बारावीच्या निकालात दहिवले आश्रम शाळेची बाजी; दिपक गायकवाड प्रथम

**बाराभाटी/दैनिक यशसिध्दि न्यूज**

नुकत्याच जाहिर झालेल्या एच.एस.सी परीक्षेचा निकालात जवळच्या येरंडी येथील श्रीमती मालिनीताई एस. दहिवले आदिवासी आश्रमशाळेतील विज्ञान शाखेचा दिपक यादव गायकवाड या विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम क्रमांक पटकाविले आहे. कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान व कला शाखेचा निकाल ९८ टक्के लागला असून विज्ञान शाखेत ३५ तर कला शाखेत २४ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते.विशेष म्हणजे कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम आलेल्या दिपक यादव याला प्रभाकर दहिकर यांनी त्याची परिस्थिती लक्षात घेता वेळोवेळी शिक्षणासाठी प्रेरीत केले. मदत केली. यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, महाविद्यालयातील अनुभवी शिक्षकवृंद, उत्तम व्यवस्था, सुसज्ज ग्रंथालय व प्रयोगशाळा व अतिरिक्त अध्यापन कार्याला दिले आहे. गुणवंत



विद्यार्थ्यांचे संस्था सचिव सुखदेव दहिवले, अध्यक्ष मालिनी दहिवले, उपाध्यक्ष रत्नदिप दहिवले, प्राचार्य त्रिवेणी रत्नदिप दहिवले, मुख्याध्यापक सुरेश कांबळे, संचालक नुतन कांबळे, प्रा. चवरे, प्रा. उंदिरवाडे, प्रा. चंद्रवंशी, प्रा. रहांगडाले, प्रा. येळे, प्रा गजभिये, चंद्रशेखर तिरपुडे व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले आहे.

# निफाड येथिल कर्मवीर मोरे महाविद्यालयाचा निकाल ९५ टक्के

**निफाड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

नासिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९४.९३ % इतका लागला आहे.

महाविद्यालयातील या परीक्षेला बसलेल्या एकूण ३९५ पैकी ३७५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. महाविद्यालयाच्या कला शाखेच्या १७८ पैकी १६५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शेकडा निकाल ९२.६९% इतका आहे. कला शाखेतील पहिले पाचही क्रमांक मुलींनी पटकावले आहेत. त्यामध्ये नीलम बाळासाहेब भगुरे, ८२%, काजल सुनील गवळी ७८.८३ % , नीलम इंदल राठोड, ७३.६७% कल्याणी अंबादास सुरवसे ७३.५०%, रूपाली सुधाकर पवार ७२.८३%. यांचा समावेश आहे. वाणिज्य विभागातील परीक्षेला बसलेले सर्व ८३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शेकडा निकाल १००% इतका लागला आहे. या विभागातून देखील पहिले पाच क्रमांक मुलींनी पटकावले आहेत. त्यामध्ये प्रांजल सोपान पवार ८८.५०% , गायत्री परसराम सानप ८६.८३% , कांचन चिंतामण ढमे ८६.३३% सुवर्णा संजय फटांगडे ८४.५०% आणि खुशी वीरसिंग कुशवाह ८४.१७ % यांचा समावेश आहे.महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा देखील निकाल ९४.७७ % इतका घवघवीत लागलेला असून परीक्षेला बसलेले १३४ पैकी १२७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या शाखेतील सर्वाधिक गुण मिळविणारे पहिले पाच विद्यार्थी आहेत, खुशी परसराम खैरे ७१.८३%, देव संदीप पानगव्हाणे ७१.८३% , सुरज गोरक्षनाथ पिसाळ ६९.७३%, खापरे कावेरी सूर्यभान ६६.३३%, मुघल साक्षी एकनाथ ६५%.

म. वि. प्र. चे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, सरचिटणीस ड. नितीन ठाकरे , चिटणीस दिलीप दळवी, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष श्री विश्र्वासराव मोरे , संचालक शिवाजी आप्पा गडाख, महिला संचालिका सौ. शोभाताई बोरस्ते, डॉ. उत्तमराव डेरले, निफाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश जाधव, प्रा. अभय वडघुले, सर्व प्राध्यापक वृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्ण संधी

सोलापूर/प्रतिनिधीः भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Combined Defence Service (CDS) या परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी नाशिक येथे नवयुवक व नवयुवयतींसाठी दिनांक १० जून ते २३ ऑगस्ट २०२४ या कालावधीत CDS कोर्स आयोजित करण्यात येत आहे. सदर कोर्ससाठी प्रशिक्षणार्थी निवास, भोजन, आणि प्रशिक्षणाची नि:शुल्क सोय करण्यात आली आहे.

तरी सोलापूर जिल्ह्यातील इच्छूक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे दिनांक ३० मे २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येते वेळी त्यांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईट सर्च करून त्यामधील CDS-63 कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पुर्ण भरून सोबत घेऊन यावे. सदर सी.डी.एस. वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद पात्रता असणे आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येतांना सोबत घेऊन यावेत. सदर प्रवेशासाठी उमेदवार हा कोणत्याची शाखेचा पदवीधर असावा, उमेदवार संघ लोकसेवा आयोग (UPSC) नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येणाऱ्या सी.डी.एस.(CDS) या परिक्षेकरिता ऑनलाईनद्वारे अर्ज केलेला असावा. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ई-मेल आयडी- training.pctcnas hik@gmail.com व दुरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सअप क्र. ९१५६०७३३०६ (प्रवेशपत्र मिळविण्यासाठी) असून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दुरध्वनीवर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

# बोपगाव येथे उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशन च्या वतीने पाणी टँकर सुरू




**पुरंदर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुरंदर तालुक्यामध्ये भीषण दुष्काळाला तोंड देत असताना ओढे,नाले,

तलाव,विहिरी,कोरड्या पडल्या असून पाणी टंचाईला तोंड देत असताना डॉ मनोज शिंदे, पत्रकार अमृत भांडवलकर व गणेश मुळीक तसेच बोपगावचे सामाजिक कार्यकर्ते साहेबराव मारुती फडतरे यांच्या विशेष प्रयत्नातून उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशन च्या वतीने पिण्याच्या पाण्यासाठी बोपगाव मध्ये पाणी टँकर सुरू,उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशन चे प्रमुख श्री दगडू लोंढे साहेब सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी फार मोठा निर्णय घेऊन पुरंदर तालुक्यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी १३ पाणी टँकर सुरू केले,त्यांचे सहकारी श्री तानाजी लोमटे साहेब तसेच रिशिका कश्यप मॅडम हे पाणी टँकर वाटपासाठी अथक परिश्रम करून नियोजन करत आहेत पाणी टँकर वाटप प्रसंगी बोपगावच्या सरपंच सौ प्रियंका शामराव फडतरे,माजी सरपंच सुषमा साहेबराव फडतरे, श्री योगेश नाना फडतरे मा स्वीकृत सदस्य जि प पुणे,श्री संदीप फडतरे संचालक नीरा कृषी उत्पन्न बाजार समिती, चांबळी गावचे सामाजिक कार्यकर्ते श्री गोरख शेंडकर व असंख्य महिला भगिनी यांच्या वतीने उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशन चे आभार व्यक्त केले.

# बौद्ध धम्म हेच लोकशाही विचारांचे उगमस्थान : केंद्रीय राज्यमंत्री आठवले

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाकारुणी तथागत भगवान गौतम बुध्दांनी अडीच हजार वर्षा पूर्वी भारतात सर्वप्रथम बहुजन हिताय बहुजन सुखाय हा जगाला लोकशाहीचा मुलमंत्र दिला.संपूर्ण जगाला लोकशाहीचा विचार




बौध्द धम्मानेच दिला आहे.विश्र्वशांती,अहिंसा,समता,विश्र्वबंधुतत्व आणि वैज्ञानिक दृष्टीकोन बौध्दधम्मानेच जगाला दिले आहे.जगात अनेक ठिकाणी युध्दजन्य स्थिती आहे.युध्दाच्या रक्तपाता पासुन जगाला वाचवण्यासाठि आजही जगाला भगवान बुध्दाच्या विचारांची गरज आहे.बौध्दधम्म सर्व मानवजातीसाठी आदर्श जीवन मार्ग आहे.असे सांगत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी २५८६ व्या बुध्द पौर्णिमे निमित्त सर्व भारतीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. दि.२३ मे रोजी बुध्द पौर्णिमे निमित्त सारनाथ येथील धम्मेक स्तुप येथे २५८६ व्या बुध्द पौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन या बुध्द जयंती महोत्सवात ना.रामदास आठवले उपस्थीत राहणार आहेत. माणसांच्या मनात विचारांचे द्वंद्व सुरु असते.सर्व क्रिया आणि क्रांतीचे मन हेच केंद्र आहे.मनावर विजय मिळविला तर माणुस जगावर विजय मिळवू शकतो.मनावर विजय मिळविण्यासाठी विपश्यनेचा मार्ग भगवान बुध्दांनी जगाला दिला आहे.भगवान बुध्दांचा विचार हा संपूर्ण मानव जातीचा उध्दार करणारा विचार आहे.बोधिसत्व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला बौध्दधम्माची दिक्षा दिल्याचा आम्हाला अभिमान आहे.असे ना. रामदास आठवले यांनी पाठवलेल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.

# नवनवीन संकल्पना राबवून प्रशासनातील अधिकाऱ्यांनी राज्याच्या विकासात योगदान द्यावे : राज्यपाल रमेश बैस



**सातारा/दैनिक यशसिध्दि न्यूज**

प्रशासनातील अधिकाऱ्यांनी नवनवीन संकल्पना राबवून राज्याच्या विकासात योगदान द्यावे, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

महाबळेश्र्वर येथे राज्यपाल रमेश बैस यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी राज्यपाल महोदयांच्या सहसचिव श्र्वेता सिंघल, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्य अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे ,अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, उपवनसंरक्षक आदिती भरद्वाज, जलसंपदा विभागाचे अरुण नाईक, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.सातारा जिल्ह्याचा सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्प, उपक्रम यांचा सखोल आढावा घेत असताना राज्यपाल रमेश बैस यांनी शिक्षण, आरोग्य, पर्यटन विकास, बांबू लागवड अदीविषयांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांचा शैक्षणिक गुणवत्ता विकास यासाठी राबविण्यात येत असलेल्या मॉडेल स्कूल या उपक्रमाबाबत माहिती घेत असताना श्री. बैस यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांची वर्गवारी ही उपलब्ध पायाभूत सुविधांच्या आधारे करत असतानाच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारेही करावी. यामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा विकास करण्यासाठी पूरक वातावरण निर्माण करावे. त्यासाठी शाळांच्या स्पर्धा आयोजित कराव्यात. ज्या शाळा चांगली कामगिरी करतील त्यांना शासनामार्फत पुरस्कार देण्यात यावेत, असे सांगितले.

या उपक्रमाबाबत बारकाईने जाणून घेत असताना त्यांनी मॉडेल स्कूलच्या निर्मितीसाठी येणारा खर्च, जिल्ह्यातील एक शिक्षकी शाळांची संख्या, शाळांमध्ये प्रयोगशाळा, संगणक लॅबची उपलब्धता आदींबाबत माहिती घेतली. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजनाचा दर्जा तपासणी नियमितपणे व्हावी व विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे मध्यान्ह भोजन मिळेल याबाबत दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. सध्याच्या काळात मुलांच्या शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. मैदानी खेळांमधील सहभाग कमी झाला आहे. त्यामुळे शाळांमध्ये मुलांच्या क्रीडा विकासावर जाणीवपूर्वक भर देण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी एकात्मिक धार्मिक, ऐतिहासिक, पर्यावरण पूरक पर्यटन विकास आराखडा राबविण्यात येत असून यामधून किल्ल्यांचा विकास करत असताना अर्काइव्हलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाची मदत घेण्यात यावी, अशी सूचना राज्यपाल श्री. बैस यांनी केली. जिल्ह्यातील प्रायोगिक तत्त्वावर करण्यात येत असलेल्या बांबू लागवडीचा आढावा घेत असताना श्री. बैस म्हणाले, बाजारपेठेच्या दृष्टीने किफायतशीर ठरणाऱ्या बांबूच्या प्रजातींची लागवड करावी. बांबूपासून असंख्य प्रकारच्या वस्तू तयार करण्यात येतात. याचे व्यावसायिक प्रशिक्षण स्थानिकांना देऊन त्यांचा उत्पन्न स्तर वाढविण्यासाठी प्रयत्न केले जावेत. पावसाळ्यापूर्वी शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना फळ रोपे, शेवगा यासारखी रोपे मोफत उपलब्ध करून द्यावीत. शेतकऱ्यांनी या रोपांची लागवड करून त्यांचे संगोपन करावे व त्यापासून मिळणारे उत्पन्न हे शेतकऱ्यांनाच देण्यात यावे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी उजाड माळराने आहेत. त्या ठिकाणी अशाप्रकारे वृक्ष लागवडीचे सूक्ष्म नियोजन करण्यात यावे.

जिल्ह्यात मुबलक प्रमाणावर दगड उपलब्ध आहेत अशा वेळी एखादी अंगणवाडी संपूर्णतः दगडी बांधकामाची अशी तयार करण्यात यावी. जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर टसर सिल्क प्रकल्प राबविण्यात येत आहे. यात सहभागी असणाऱ्या शेतकऱ्यांना सिल्क धागा तयार करण्यासाठी प्रोत्साहन व प्रशिक्षण देण्यात यावे. बांबूपासूनही धागा तयार करण्याच्या दृष्टीने प्रकल्प राबवावेत, अशा सूचना राज्यपाल श्री.बैस यांनी यावेळी दिल्या.या बैठकीत जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डुडी यांनी जिल्ह्याचा संपूर्ण आढावा सादर केला.

यामध्ये जिल्ह्यात राबविण्यात येत असणारा मॉडेल स्कूल या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबरोबरच स्मार्ट पीएचसी ,जिल्ह्याचा एकात्मिक धार्मिक, ऐतिहासिक, पर्यावरण पूरक पर्यटन विकास आराखडा, बांबू लागवड उपक्रम, अभिनव अंगणवाडी, टसर सिल्क उत्पादन प्रकल्प, आदींबाबत सविस्तर माहिती दिली. पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी पोलीस विभागाच्या कामकाजाबाबत माहिती दिली.

# ईटकुर येथे खरीप पूर्व नियोजित बैठक

**कळंब/दैनिक यशसिध्दि न्यूज**

कळंब तालुक्यातील ईटकुर येथे खरीप पूर्व नियोजन बैठक घेण्यात आली.सदर बैठकीमध्ये गावातील प्रगतशील शेतकरी उपस्थित होते. या बैठकीत बियाणे उगवण क्षमता, बीज प्रक्रिया, गोगलगाय या विषयावर शेतकऱ्यांना माहिती दिली. पेरणी करताना बियाणे निवड करून बिजप्रक्रिया का करावी याबाबत सविस्तर महिती दिली. तसेच बिजप्रक्रिया कशी करावी, कोणती औषधे वापरावे, बिजप्रक्रिया करताना काय काळजी घ्यावी याबाबत सविस्तर महिती दिली.बियाने उगवणक्षमता तपासणी करण्यासाठी कोणत्या पद्धतीने करावी त्या पद्धती सांगून त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. गोगलगाय व्यवस्थापन करण्यासाठी काय काय करावे याबाबत सविस्तर महिती सांगून सर्वांनी, एकत्रितपणे काम करण्यासाठी आवाहन केले.पेरणी करताना सलग पेरणी करण्यापेक्षा बी बि एफ व सरी वरंबा पद्धतीने पेरणी करण्याचे आवाहन केले. तसेच कृषी सहाय्यक आर. व्ही. जाधव यांनी कृषी विभागाच्या विविध योजनेची माहिती शेतकऱ्यांना दिली व महाडीबीटीवरील विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याचे सांगितले.खरिपातील विविध पिकांच्या बियाण्यांसाठी अर्ज करून महाडिबीटी वरील सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना आवाहन केले.मागिल वर्षात काय अडचणी आल्या, त्यावर काय उपाययोजना केल्या यावर सविस्तर चर्चा केली. सरी वरंबा लागवड केलेल्या शेतकऱ्यांचे अनुभव सांगण्याचे आवाहन केल्यानंतर शेतकऱ्यांनी अनुभव कथन केले.यामध्ये आलेले उत्पन्न, झालेला खर्च,व पुढच्या पिकावर झालेला परिणाम यावर सविस्तर महिती दिली.



जेणेकरून लागवड पद्धती मध्ये बदल करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. पिक पद्धती मध्ये बदल करण्याचे आवाहन केले यावेळी श्रीमती एस. व्ही.शिंदे कृषी सहाय्यक ईटकूर १ मंडळ कृषी अधिकारी वैभव तांबारे, कृषी पर्यवेक्षक बप्पासाहेब पाटील कृषी सहाय्यक मनोज पाटील, बी.जी शिंदे, रामकृष्ण कोठावळे, अतुल पाटील,पोलीस पाटील सोमनाथ जगताप, व इतर शेतकरी आणि महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवा शेतकरी सचिन आप्पा गंभिरे यांनी सर्वांचे आभार मानले.

# ठाणे, मिरजेत घरफोडी करणाऱ्या तरुणाला अटक

**सांगली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

सांगली : मिरजेतील कृष्णाघाट रस्त्यावरील राष्ट्रीय महामार्गाच्या पुलाखाली चोरीचे सोने विक्रीच्या प्रयत्नात असलेल्या तरुणाला अटक करुन १७ लाख ६१ हजाराचे चोरीतील सुवर्णालंकार पोलीसांनी बुधवारी जप्त केले. मिरजेसह तीन ठिकाणी चोऱ्या केल्याची कबुली त्यांने दिली. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला घाट रस्त्यावर संशयित तरुण चोरीतील सोन्याचे दागिने विक्री करणेकरीता येणार असल्याची माहिती मिळाली होती. पोलीसांनी पुलाचे परिसरात सापळा लावून निगराणी करीत असताना, एक इसम पुलाखाली येवून थांबलेला दिसला. त्याचा बातमीप्रमाणे संशय आलेने निरीक्षक सतिश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सिकंदर वर्धन व पथकाने अमित राकेश पंचम (वय ३० वर्षे, सध्या रा. वानलेसवाडी, सांगली मुळ रा. राबोडी, शिवाजीनगर, ठाणे) असे असलेचे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या हातातील पिशवीत १७ लाख ६१ हजाराचे २९० ग्रॅम वजनाचे सोन्याचे व ८० ग्रॅम वजनाचे ४ हजाराचे चांदीचे दागिने मिळुन आले. त्याने सागितले की, त्याचेजवळ मिळुन आलेले सोन्या चांदीचे दागिने हे मिरज व नौपाडा (जि. ठाणे) येथे घरफोडी करुन या ऐवजाची चोरी केली होती.

# बार्टीमुळेच मी UPSC उत्तीर्ण होऊ शकले : कांबळे

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

माझे आदर्श विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर हे असून मी सामान्य कुटुंबातील असल्यामुळे मुंबई शहरामध्ये UPSC स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण घेणे कठीण होते. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या शिष्यवृत्तीमुळेच मी दिल्लीमध्ये नामांकित कोचिंग क्लासचे प्रशिक्षण घेऊ शकले. माझ्या यशात बार्टीचा सिंहाचा वाटा असून बार्टीमुळेच मी UPSC परीक्षा पास झाले.बार्टी लाखो मुलांची स्वप्न पूर्ण करणारी नामांकित संस्था असून बार्टी संस्थेचे तत्कालीन महासंचालक श्री धम्मज्योती गजभिये , विद्यमान बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आम्हाला नागरी सेवेत जाण्याची संधी मिळाली असून बार्टीसाठी समाजासाठी जे जे शक्य आहे ते करण्यासाठी मी कटिबद्ध असल्याचे गौरवउद्गगार बार्टी UPSC उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी श्रीमती वृषाली कांबळे यांनी बोलताना व्यक्त केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे दिनांक २२ मे २०२४ रोजी बार्टी अंतर्गत निवासी णझडउ प्रशिक्षण केंद्र येरवडा, पुणे येथील विद्यार्थ्यांसाठी श्रीमती वृषाली कांबळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण , श्रीमती शुभांगी पाटील यांच्या हस्ते श्रीमती वृषाली कांबळे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा व भारतीय राज्यघटनेची प्रत भेट देऊन सन्मानित करण्यात आले.बार्टी मुख्यालयातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या उपस्थित पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विभागप्रमुख श्रीमती वृषाली शिंदे, शुभांगी पाटील यांच्या हस्ते श्रीमती वृषाली कांबळे यांना संविधानाची प्रत, पुष्पगुच्छ भेट देऊन सन्मान करण्यात आला.



याप्रसंगी विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण श्रीमती वृषाली शिंदे, अनिल कारंडे,शुभांगी पाटील, विकास गायकवाड यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक श्री विकास गायकवाड यांनी केले. आभार विभागप्रमुख श्रीमती शुभांगी पाटील यांनी मानले.

# भूताळसिध्द यात्रेनिमित्त हन्नूर येथे कार्यक्रम

**अक्कलकोट/प्रतिनिधी:** हन्नूर येथे भूताळसिध्द यात्रेनिमित्त विविध धार्मिक उपक्रम पार पडले. यात्रेच्या पहिल्या दिवशी दिवसभर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. अक्कलकोट विरक्त मठाचे मठाधिपती बसलिंगेश्वर महास्वामीजींच्या अमृतहस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर भारूडाचा कार्यक्रम घेण्यात आला. दुसऱ्या दिवशी सकाळी शोभा महाल यांच्यावतीने हनुमान मंदिरात भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. सायंकाळी चांदीच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. तिसऱ्या दिवशी पहाटे तीन वाजता भूताळसिध्द गदगीस महाभिषेक करण्यात आला. चार वाजता हरणा नदी येथे सात पालख्यांचे गंगास्थल झाले. यामध्ये बोरेगाव, निलेगाव, नंदर्गी, हन्नूर, रूद्देवाडी, बोरगाव देशमुख आदी गावांतील पालख्यांचा समावेश होता. यानंतर मंदिरात फूल चढविण्यात आले. मंदिरात पाच किलो चांदीची मूर्ती असून देवासाठी सात तोळे सोन्याचे दागिने बनविण्यात आले आहेत. मंदिरात आरकेरी येथील बनसिध्द महाराज, कल्लप्पावाडी येथील शिवसिध्द महाराज यांच्या हस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. सकाळी दहा वाजता सुभाष महाराज पुजारी यांच्या तुलाभाराचा कार्यक्रम घेण्यात आला. तसेच दिवसभर धनगरी ओव्या सादर करण्यात आल्या. चौथ्या दिवशी सकाळी गावातील प्रमुख मार्गावरून मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर अनेक भाविकांच्या उपस्थितीत पालखी भेटीचा सोहळा पार पडला.



# राजीव गांधी पुण्यतिथी काँग्रेसतर्फे साजरी

**सोलापूर/प्रतिनिधी**

काँग्रेस कमिटीच्यावतीने माजी पंतप्रधान, भारतरत्न राजीव गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. काँग्रेस भवन येथे आयोजित कार्यक्रमात शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्या हस्ते राजीय गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी शहर महिलाध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, सुनील रसाळे, अशोक कलशेट्टी, तिरुपती परकीपंडला, हेमा चिंचोळकर, माजी नगरसेवक उपेंद्र ठाकर, विश्वनाथ साबळे, पशुपती माशाळ आदी उपस्थित होते. वयाच्या ४० व्या वर्षी पंतप्रधान बनलेले राजीव गांधी भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते आणि कदाचित जगातील अशा तरुण राजकीय नेत्यांपैकी एक होते, ज्यांनी सरकारचे नेतृत्व केले. त्यांच्या काळातील कॉम्प्युटरविषयीच्या महत्त्वाची घडामोड म्हणजे रेल्वे आरक्षणासाठीचे सॉफ्टवेअर तयार होणे आणि बँकांनी आपल्या कामकाजामध्ये कॉम्प्युटरचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू करणे या होत्या. भारतातील तंत्रज्ञान क्षेत्रामधील राजीव गांधींचे अल्पकाळातील योगदान महत्त्वाचे आहे, असे नरोटे यांनी सांगितले. यावेळी करिमुन्निसा बागवान, सुमन जाधव, अनिल मस्के, लखन गायकवाड, जितू वाडेकर, सुभाष वाघमारे, संजय गायकवाड, उबाळे आदी उपस्थित होते.



# आठ घरफोड्या करणारे गुन्हेगार अटकेत



सोलापूर/प्रतिनिधी: शहर व परिसरात घरफोड्या करणाऱ्या चोरट्यांच्या मुसक्या आवळून एकूण आठ घरफोड्या उघडकीस आणण्यात एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास यश आले आहे. नंदकुमार विजय कोक्कूल (वय ३१, रा. नवीन विडी घरकूल, कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर), शाहू सिध्दप्पा काळे (वय ३६, रा. पारधी वस्ती, शरणशिरसंगी, ता. अफजलपूर, जि. कलबुरगी), एक अल्पवयीन बालक या तिघांविरुध्द गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाकडून शहरातील घरफोडी करणाऱ्या आरोपींचा शोध घेण्यात ेत होता. त्यादरम्यान गोपनीय माहितीच्या आधारे या तिघांना ताब्यात घेतले. त्यांनी आठ घरफोडी केल्याचे कबुल केले. त्यांच्याकडून एकूण ३ लाख ५९ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त एम. राज कुमार, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहायक पोलीस आयुक्त अशोक तोरडमल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघमारे, पोलीस निरीक्षक विजय खोमणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके, हवालदार राकेश पाटील, नाना उबाळे, दीपक डोके, सचिन भांगे, पोलीस नाईक मंगेश गायकवाड, सुहास अर्जुन, शंकर याळगी यांच्या पथकाने पार पाडली.